


RNI. : MAHMAR / 2011 / 43064

।। श्री विश्वकर्मणें नमः।।

स्थापना: १९९५

भारत सरकार मान्यताप्राप्त

Posted at Patrica Channel STG.Office,GPO,Mumbai-01.
Published on 7th of Every Month
Posting Date: 7th/8th of Every Month

# विश्वकर्मा पंचाल

महाराष्ट्रव्यापी पंचाल सुवर्णकारांचे एकमेव बुलंद मासिक vpmonthly@gmail.com

उपसंपादक - सुनिल स. सागवेकर | उपसंपादक - मोहन ह. नगरकर | उपसंपादक - अतुल रा. देवरुखकर

**विश्वकर्मा पंचाल केवळ वृत्तपत्र नव्हे, तर समाजप्रबोधनाचे विचारपत्रक जे प्रत्येक समाजबांधवाच्या घरी पोहचलेच पाहिजे!**

REGD.NO.: MCE/215/2022-24 ☯ वर्ष १३ ☯ अंक ०९ ☯ फेब्रुवारी २०२४ ☯ मुंबई ☯ पृष्ठे - ४ ☯ मुल्य २रु.

## संस्थांचे कार्यकर्ते, लग्न जमविणारे समाजबांधव यांना आवाहन

संगमेश्वर : रविवार, १८ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्रातील समाजबांधवांच्या हितासाठी आयोजित केलेला भव्य वधूवर मेळावा खास करुन वधू-वर, पालक, समाजबांधव, संस्थांचे कार्यकर्ते, लग्न जमविणारे बांधव यांनी सक्रिय सहकार्य करून यशस्वी करावा असे कळकळीचे आवाहन सकल समाजाला करण्यात येत आहे. खर तर समाज ह्या शब्दाचा अर्थ कालपरत्वे बदलत चालला असल्याचे सहजगत्या जाणवत आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये. परंतू आपल्याच नव्हे तर सर्व ज्ञाती समाजाला वैवाहिक समस्यांनी ग्रासले आहे. निष्ठावंत समाजप्रेमीना तर कमालीचा मानसिक त्रास सहन करावा लागतो आहे. यामध्ये ग्रामिण भागातील अथवा तालुका स्तरावर तर लग्न जमविणे ही जणू कसरत होत आहे. जणू खेडोपाड्यात राहून उदरनिर्वाहासाठी तेथेच जवळपास नोकरी करणाऱ्या वधूवरांची कुचंबणा होत आहे. आता तर शेती करणे या क्षेत्रात आजची पिढी उतरत नाहीत. मात्र तालुक्याच्या ठिकाणी नोकरी करणाऱ्यांना जणू कोण वालीच उरला नाही असे स्पष्ट चित्र दिसत आहे. यामध्ये घटस्फोटीत, परित्यक्ता, विधवा, विधूर, अधिक वयमान झालेले अशा विविध स्तरातील विवाह इच्छुकांचे तर काय हाल आहेत ते शब्दात देखिल व्यक्त करता येणार नाहीत. २० हजार ते लाखभर पगार घेणाऱ्याही

(पुढील वृत्त पान २ वर....)

## विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेच्या अध्यक्षपदी संजय स. देवरुखकर यांची नियुक्ती



मुंबई : संस्थेच्या सन २०२२ ते २०२५ सालाकरिता माननीय श्री. श्रीधर रा. सागवेकर यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. परंतु मे २०२३ पासून त्यांची तब्येत खालावली होती म्हणून त्यांनी संस्थेकडे आपला राजीनामा सुपूर्द केला. त्यानुसार संस्थेच्या कार्यकारिणीच्या दि. ०७ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या सभेत श्रीधर रा.सागवेकर यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला आणि या विषयावर सारासार विचार विमर्ष करून सध्याचे उपाध्यक्ष श्री. संजय सखाराम देवरुखकर यांची सर्वानुमते अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. यावेळी संस्थेचे सल्लागार मान. श्री. जगन्नाथ म. देवरुखकर श्री रघुनाथ गं.देवरुखकर यांच्या उपस्थितीत हा निर्णय झाला. त्यावेळी श्री. ज. म. देवरुखकर यांनी थोर ज्येष्ठ समाजकार्यकर्ते,सल्लागार स्व. सखारामशेठ धोंडू देवरुखकर यांचे दुहेरी स्वप्नं साकार झाले असा उल्लेख केला.संस्थेची जागा होण्याचे स्वप्नं त्यांचा पुत्र संजय आणि प्रमुख कार्यकर्ते आणि कार्यकारिणीच्या सहकार्याने पूर्ण झाले. त्यांना संस्थेबद्दल आस्था होती. त्याचप्रमाणे

(पुढील वृत्त पान ४ वर....)

### बिझ महाराष्ट्र ग्रोथ शिखर (Biz Maharashtra Growth Summit)

## उद्योजकता आणि आर्थिक विकासाची सुवर्णसंधी

### संगमेश्वर येथे विशेष परिषदेचे आयोजन

विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज, मुंबई संस्थेचे विश्वकर्मा पंचाल मासिक ३० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्त विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था जिल्हा रत्नागिरी आणि विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती संस्था तालुका संगमेश्वर यांच्या विशेष सहकार्याने संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी येथे रविवार, दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १.०० वा. भावी उद्योजक, व्यावसायिक घडविण्यासाठी खास परिषद "बिझ महाराष्ट्र" आयोजित करीत आहे. सर्व स्तरातील उद्योजकांसाठी महत्त्वाच्या विविध सरकारी योजनांची माहिती व व्यवसाय विकासासाठी, विविध मार्ग शोधण्याची ती एक उत्तम संधी असेल. लघु आणि मध्यम उद्योगांच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, लघुउद्योजकांना प्रोत्साहन देणे, रोजगार आणि आर्थिक विकासासाठी MSME साठी अनेक सरकारी योजनांची जागरूकता निर्माण करणे आणि विद्यमान उद्योजकांना आर्थिक पाठिंबा देणे हे या परिषदेच्या योजनांचे लक्ष्य आहे. तरी लहान मोठ्या विविध उद्योगाची कास धरुन स्वप्नपुर्ती करण्यासाठी या परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

या परिषदेसाठी खास उपस्थिती:

**सौ. मृणाली इल्ले, संचालक** (MSME GLOBAL NETWORKS)

**मा. अदिप वेर्णेकर** - सरचिटणीस, मुंबई सुवर्णकार संघ (ट्रेड युनियन),

विविध सरकारी (केंद्र आणि राज्य) तसेच खाजगी संस्थांतील मान्यवर वक्ते उपस्थित राहतील.

★ **एमएसएमई ग्लोबल नेटवर्क्स** (MSME GLOBAL NETWORKS)

★ **नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन लि.** (NATIONAL SMALL INDUSTRIES CORPORATION LTD)

★ **कॉयर बोर्ड** (COIR BOARD)

★ **जिल्हा उद्योग केंद्र** (DISTRICT INDUSTRIES CENTRE)

★ **खादी आणि ग्रामोद्योग आयोग** (KHADI & VILLAGE INDUSTRIES COMMISSION)

★ **ग्राम विकास कौशल्य** (GRAM VIKAS KAUSHALYA)

**स्थळ:** शुभगंधा मंगल कार्यालय, मयूर बाग, संगमेश्वर देवरूख रोड, तालुका संगमेश्वर, जि. रत्नागिरी,

**रविवार १८ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १ वाजल्यापासून.**




## विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संचालित युवामंच सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०२४ प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न

प्रथम महाराष्ट्रातील तमाम ज्ञाती बंधू-भगिनी व युवक-युवतींना विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संचालित युवामंच तर्फे नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

रविवार दिनांक ७ जानेवारी २०२४ रोजी युवामंच सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०२४ प्रकाशन सोहळा उपरोक्त संस्थेच्या दादर येथील कार्यालयामध्ये संपन्न झाला. महासंघाचे अध्यक्ष श्री.सदानंद दत्तात्रय नगरकर व मुंबई संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री.संजय सखाराम देवरुखकर, संस्थेचे सचिव व महासंघाचे उपसचिव श्री. मोहन ह. नगरकर, मुंबई संस्थेचे माजी अध्यक्ष श्री.विलास वि. वाडेकर, महिला संघटना अध्यक्ष श्रीमती अनिता प्रमोद सागवेकर, संस्थेचे सल्लागार तसेच महासंघाचे माजी अध्यक्ष श्री.जगन्नाथ म. देवरुखकर, संस्थेचे सल्लागार श्री. रघुनाथ ग. देवरुखकर व युवामंचचे अध्यक्ष श्री. गणेश द. सागवेकर, सचिव श्री.अतुल रा. देवरुखकर आदी उपस्थित संस्थेचे मान्यवर पदाधिकारी, युवामंचचे पदाधिकारी, महिला संघटना पदाधिकारी व विभाग प्रमुख या सर्वांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन करून व दिवंगत समाज बांधवांना श्रद्धांजली वाहून करण्यात आली, यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले, सर्वांच्या अनुमतीने आणि मान्यवरांच्या हस्ते युवामंच सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०२४ चे प्रकाशन करण्यात आले, दिनदर्शिकेचे मुखपृष्ठ, छपाई व आकर्षक विधान पाहून सर्वांचे मन प्रसन्न झाले. मुखपृष्ठावरील चांद्रयान व स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारसरणीला उद्देशून तसेच चांद्रयानप्रमाणे संस्थेचा झेंडा अटकेपार नेऊ अशी संकल्पना व चित्र आणि दिलेला संदेश खूप काही सांगून जातो अशी सर्वसंपन्न दिनदर्शिका पाहून सर्वांनी टाळ्या वाजवून त्याबद्दल कौतुक केले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री.संजय स.देवरुखकर यांचे यांचे मुंबई युवामंच तर्फे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन करण्यात आले, तसेच पुढील वाटचालीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर महासंघाचे अध्यक्ष श्री.

(पुढील वृत्त पान ३ वर....)

विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई (रजि.) च्या वतीने सामुदायिक मौजीबंधनसाठी जाहिर आवाहन! -पान २ वर

पुणे सुवर्णकार ज्ञाती संस्था आणि स्त्री शक्ती मंचच्या वतीने सामुदायिक मौजीबंधनसाठी जाहिर आवाहन! -पान ३ वर

## विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई च्या वतीने सामुदायिक मौजीबंधनसाठी जाहिर आवाहन!

यंदा विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई संस्थेच्या वतीने रविवार दि.२८ एप्रिल २०२४ मध्ये सामुदायिक मौजीबंधन सोहळा आयोजित केला आहे. त्यानुसार ज्या सभासदांस आपल्या मुलांची मुंज (उपनयन संस्कार ) करण्याची इच्छा असल्यास, लवकरात लवकर संस्थेकडे नोंदणी करावी. **प्रत्येक बटूस रुपये ३,५००/- वर्गणी आकारण्यात येत आहे.**

मौजीबंधन नावे नोंदणीसाठी खालील संबंधित कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा अन्यथा दादर पश्चिम येथे संस्थेस भेट द्यावी .

सदानंद द. नगरकर (जोगेश्वरी) ९८२०८३२८००
विनायक रा. सागवेकर (ठाणे) ९९८७२०१०५१
संजय स.देवरूखकर (बोरीवली) ९६१९३५८८९९
उदय रा.सागवेकर (ठाणे) ८२९१६६४०९९
मनोहर ल.पालकर (काळाचौकी) ९८६९५०५७६६
विलास वि.वाडेकर (काळाचौकी) ९८२०७७८०८२
प्रकाश अ.वाडेकर.(कल्याण) ९८३३३१४१६१
दिपक र.सागवेकर( ठाणे) ९८९२६८२३४४
अशोक र.पालकर (कांजुरमार्ग) ९३२३२८७३४१
सुहास बसणकर (घाटकोपर) ९८७०७०३२३९
विलास गो.नगरकर (अंधेरी) ९८६९९६४९८४
रमाकांत कृष्णा पालकर (मालाड) ९८९२१८७९४३
मंगेश र.पालकर (गोवंडी) ९९७५०६३३७३
भरत र.सागवेकर (वरळी) ९८२१६५१८३९

**मौजीबंधन सोहळा ठिकाण**
डॉ. धर्माजी हरी खरुडे मंडई सभागृह, पहिला माळा, आदर्शनगर, साईदत्त सेवा मंडळासमोर,वरळी फायर ब्रिगेडजवळ, सेंच्युरी बाजार, वरळी कॉलनी, मुंबई ४०००३०

**आपले सहकार्य हेच संस्थेच्या यशाचे रहस्य.**

आपले स्नेहांकित,

**श्री.संजय स. देवरुखकर** (अध्यक्ष)

**श्री.मोहन ह. नगरकर** (सरचिटणीस)

## संस्थांचे कार्यकर्ते, लग्न जमविणारे समाजबांधव यांना आवाहन

(वृत्त पान १ वरुन)

मुला -मुलींची लग्ने जमत नाही. हे शल्य समाजाच्या कार्यकर्त्यांना नक्कीच बोचणारे व चिंतन करणारे आहे. काय म्हणत असतील त्या मुला-मुलींचे पालक? असंख्यजण तर चिंतेने ग्रासलेले आहेत.

या सर्वांच्या समस्या दूर करावयाच्या असतील आणि आपणास समाज हवा असेल तर त्या समाजाचे अश्रू, दु:खे दूर करण्याचा प्रांजळपणे प्रयत्न केला पाहिजे. वधूवर समस्यांच्या पालखीचे भोयी बनले पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यातील, तालुक्यातील, गावातील, शहरातील समाजाच्या प्रत्येक घराघरातील वधूवरांची नोंद करण्याचा विडा उचलला पाहिजे. तरच समस्येचे निर्मुलन होऊ शकेल यात संदेह नाही. पालक व वधू-वरांना सुध्दा तडजोडीसाठी समुपदेशन, उचित मार्गदर्शनाची गरज भासते आहे. पण ते करायचे कुणी? हे मात्र न सुटणारे कोडेच म्हणावे लागेल.

म्हणूनच हे कार्य त्या त्या तालुक्यातील, शहरातील, जिल्ह्यातील संस्थानी एकजुटीने त्यासाठी एकवटले पाहिजे. केवळ वार्षिक सभा, पारितोषिक सोहळे, सांस्कृतिक सोहळे, मौजिबंधन याचबरोबर वधूवर परिचय मेळावे देखील झाले पाहिजेत. तसेच उपवर नववधूंची वेळेवर नोंदणी सुध्दा पालकांनीच केली पाहिजे. प्रत्येक संस्थेकडे तशी यंत्रणा असणे गरजेचे आहे असे का बरं, नाही वाटत कोणाला?

समाज एकजीव राहिला पाहिजे हे बोलणे सोपे आहे. मात्र कार्यकर्ता हा कोणी नोकर नसतो सर्वच समस्या तुमच्या घरी येऊन सोडवायला त्यालाही उद्योग प्रपंच असतो. स्वत:चे कुटूंब सांभाळून तो जातीसाठी माती खात असतो, स्वत:च्या कुटूंबातील अनमोल वेळ बाजूला काढून. घरचा आहेर खाऊन. समाजबांधवांनी त्याची जाणीव ठेवली पाहिजे. कारण असंख्य समाजबांधव सधन असूनदेखील समाजासाठी वेळ देत नाहीत. कार्यकर्त्यांना दोष मात्र आवर्जून देतात. मात्र वेळ देता नाही आला तरी आर्थिक हातभार तरी देवून समाजाला योगदान दिले पाहिजे असं नाही का वाटत कुणाला.

**महाराष्ट्रव्यापी विश्वकर्मा पंचाल वधूवर केंद्र आणि वधूवर मेळावा ही तर ऐतिहासीक पर्वणी**

फक्त वधूवर मेळाव्याचे आयोजन करुन समस्या सुटणार नाही. तर समाजबांधवांना आपली वज्रमुठ एकवटली पाहिजे. समाजाच्या प्रत्येक कुटूंबातील उपवर वधूवरांच्या लग्नपत्रिका त्यासाठी वधूवर नोंदणीसाठी देणे गरजेचे आहे. काही निवडक मंडळींनी तर केवळ आपल्या वधूवरांच्या लग्नपत्रिका नोंद न करता आयत्या बिळावर नागोबा असा प्रकार करु नये. असा प्रकार घडू नये यासाठी प्रत्येक तालुक्यातील जागरुक लग्न जमविणाऱ्या समाजबांधवांनी आणि ज्ञाती संस्थांनी प्रत्येक कुटूंबातील लग्न पत्रिका विश्वकर्मा पंचाल वधूवर सुचक केंद्राकडे पाठविण्यासाठी सतर्क रहाणे गरजेचे आहे. संपुर्ण महाराष्ट्रातील पत्रिका एका व्यासपीठावर आल्यामुळे वधूवर केंद्राच्या माध्यमातून त्या महाराष्ट्रातील सर्व ज्ञातीबांधवांच्या घरोघरी व्हाट्सअॅप आणि वेबसाईटच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचतील. यामुळे आपल्या वधूवरांना देखील खुले व्यासपीठ उपलब्ध होईल. अनेक स्थळे उपलब्ध झाल्यामुळे समाजातील उपवर वधू-वर, अधिक वयाचे वधू-वर, परित्यक्ता, घटस्फोटीत वधूवरांना पर्याय उपलब्ध होतील आणी विवाहविषयक समस्या सुटण्यास मोलाची मदत होईल. समाजातील वधूवर देखील मुक्तपणे पर्याय निवडण्यासाठी धजावतील मनाप्रमाणे पर्याय त्यांच्यासाठी उपलब्ध झाल्यामुळे खऱ्या अर्थाने समाजसेवा होत असल्याचे अनुभवास येईल.

सदर वधूवर मेळाव्यासाठी खरं तर ज्यांना लग्न करावयाचे आहे अशांनी या मेळाव्यास प्रत्यक्ष हजर राहून सहकार्य करणे गरजेचे आहे. वधूवर आणि पालकहो, आपणासाठी समाजकार्यकर्ते अतिशय परिश्रमपुर्वक मेळाव्याचे आयोजन करीत आहेत. ते केवळ समाजऋणाची जाणीव ठेवूनच. म्हणूनच महाराष्ट्रातील विविध शहरे आणि गावातून वधूवर मेळाव्यासाठी उपस्थित रहाणार असल्याचे मोबाईलद्वारे सुचीत करीत आहे. त्यांचा उत्साह पाहुन आता वधूवर मेळाव्याच्या आयोजकांनाही स्फुरण चढले आहे.

संगमेश्वर आणि रत्नागिरी जिल्हा संस्था हा मेळावा यशस्वी करण्यासाठी नियोजन करुन आपल्या सेवेसाठी जय्यत तयारी करीत आहे. तेथील कार्यकर्तेही जोमाने एकवटले आहेत हे येथे अभिमानाने नमुद करावेसे वाटते. अनेक पालकांनी आपल्या जाण्या-येण्याची तिकीटीही आरक्षित केलेल्या आहेत. मुंबई, ठाणे, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, रायगड, सिंधुदूर्ग, सुरत, रत्नागिरी जिल्ह्यातील तालुका संस्था आपआपल्या विभागीत वधूवरांच्या लग्नपत्रिका एकत्र करुन त्या केंद्राकडे पाठविण्याच्या लगबगीत आहेत. दुपारच्या भोजनाची व्यवस्थेसह वधूवर मेळावा विनाशुल्क म्हणजेच मोफत असेल याची नोंद समाजबांधवांनी घ्यावी.

तेंव्हा आपल्या स्वागतासाठी रत्नागिरी जिल्हा आणि संगमेश्वर तालुक्यासह संपादक मंडळ देखील सज्ज आहे. आपण महाराष्ट्रातील सर्व ज्ञाती संस्था, लग्न जमविणारे समाजबांधव, लग्नासाठी इच्छुक वधूवर आणि पालक यांनी कृपया अगत्यपुर्वक उपस्थित राहून वधूवर मेळावा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे अशी ज्ञाती चरणी विनम्र प्रार्थना!

### ❁ हार्दिक अभिनंदन ❁

## ग्रामपंचायत वावे तर्फे खेड उपसरपंच पदी संजय सागवेकर



तालुक्यातील वावे तर्फे खेड उपसरपंच श्री.संजय बळीराम सागवेकर यांची निवड करण्यात आली. त्यानी गावातील लोक सेवेत काही वर्षे तंटामुक्त अध्यक्ष म्हणून काम सुद्धा एकजुटीने केले आहे. तसेच समाजाचे काम पण हिरीरिने करत आहे याचा समाजाला खूप अभिमान आहे. यावेळी ग्राम पंचायत सरपंच-महेश उतेकर. सदस्य- अनिता उतेकर, अंकिता उतेकर, ग्रामसेवक-खलेकर, शिपाई- आशिष उतेकर, आणि ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार समाज खेडच्या वतीने खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

## रुपेश रा.पालकर तालुकास्तरीय भात पीक स्पर्धेत द्वितीय



महाराष्ट्र कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२३/२४ तालुकास्तरीय भात पीक या स्पर्धेत मुक्काम पणदेरी, तालुका मंडणगड, रत्नागिरी येथील समाज बांधव श्री. रामचंद्र दत्तू पालकर यांचे चि.रुपेश रा.पालकर यांनी हेक्टरी ८४.२० क्विंटल उत्पादन घेऊन तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळविल्याबद्दल समस्त पणदेरी ग्रामस्थ व जागृत हनुमान सुवर्णकार मंडळाकडून आणि समस्त समाज बंधू-भगिनींकडून हार्दिक शुभेच्छा!



चिपळूण : खेर्डी विभागाचे पोलीस दुरक्षेत्र येथे भारताच्या संपन्न झालेल्या अमृतमहोत्सवी प्रजासत्ताक दिन सोहळ्यात ध्वजारोहण सोहळ्यात मा. प्रदीप राजाराम देवरुखकर यांनी माऊथ ऑर्गनवर सुरेख असं राष्ट्रगीत सादर करून अंगीकृत कलेचा नजराणा पेश करून वाहव्वा मिळविली. आदरणीय प्रदिपजींचे मन:पूर्वक अभिनंदन!

## रामजन्मभूमी येथे कारसेवा केलेले श्री. बाळकृष्ण बबन वाडेकर



!!जय श्रीराम!! कारसेवक - श्री बाळकृष्ण बबन वाडेकर, १९९२ मध्ये रामजन्मभूमी येथे कारसेवा केलेले आपले समाजबांधव श्री. बाळकृष्ण बबन वाडेकर (राहणारे - लालबाग (काळाचौकी), गाव - कोकिसरे) आणि त्यांचे सहकारी, यात आपल्या सर्व कार सेवकांची मेहनत खूप महान होती. म्हणूनच आजचा हा आपल्याला आनंदाचा खास क्षण पाहता येत आहे. तुम्हा सर्व कारसेवकाची मेहनत, त्याग हे महान कार्यासाठी आज फळाला आले. त्याबद्दल आपणा सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन!! आम्हा सर्व सुवर्णकार बंधुभगिनिना याचा अभिमान आहे.
जय श्री राम !



अंधेरीचे विभागप्रमुख श्री.नरेंद्र काशीनाथ देवरुखकर ह्यांचा मुलगा **चि. नितेश** ह्यांनी त्याच्या सोसायटीत काढलेले **श्री रामाचे रांगोळी** चित्राबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



## वाढदिवस अभिष्टचिंतन!

पुणे सुवर्णकार ज्ञाती संस्थेचे कळस विश्रांतवाडी विभागाचे प्रमुख **श्री. संदीप महादेव देवरुखकर** यांना वाढदिवसानिमित्त सर्व समाज बंधुभगिनिकडून हार्दिक शुभेच्छा! त्यांच्या हातून निरंतर समाजाची सेवा घडो अशी गणपती चरणी प्रार्थना! वाढदिवसानिमित्त त्यांनी विश्वकर्मा पंचाल मासिकास रू.५००/- देणगी दिली






## आजीवन सभासदांचे हार्दिक स्वागत !



**श्री सतीश मनोहर नगरकर**
**पत्ता -:** घर क्रमांक ६००/२, गुरुकृपा आशिष बिल्डिंग जवळ, मोठा खांदा, तालुका - पनवेल, जिल्हा रायगड, पिन ४१०२०९
**मोबाईल क्र.** ८१६९६८६४३५

# दिवा, डोंबिवली, कल्याण, भिवंडी ते कर्जत - कसारा विभागीय संस्थेचे दिनदर्शिका प्रकाशन व विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न




दिवा, डोंबिवली, कल्याण, भिवंडी ते कर्जत, कसारा या विभागीय संस्थेचे २०२४ ची दिनदर्शिका प्रकाशन सोहळा दि.७ जानेवारी,२०२४ रोजी संध्या.५ वा. स्वामी नारायण मंदिर, गांधी नगर, डोंबिवली पूर्व येथे मोठ्या दिमाखदार सोहळ्यात आणि ज्ञाती बंधू व भगिनिंच्या मोठ्या उपस्थितीत पार पडला. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते आपले देव श्री.विश्वकर्मा आणि श्री.नरहरी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विभागीय संस्थेतील ज्येष्ठ सदस्य श्री.हरिश्चंद्र देवरुखकर गुरुजी, श्री.दत्ताराम देवरुखकर, श्री.सुरेश सागवेकर, श्री. दत्तात्रय नगरकर, श्री.रघुनाथ सागवेकर, नुकतीच निवड झालेले बदलापूरचे विभागप्रमुख श्री. विजय देवरूखकर व उपाध्यक्षपदी निवड झालेले भिवंडीचे श्री.विजय रमेश पालकर यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन मोठ्या दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. १०वी व १२वी पास झालेल्या खालील विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

सृष्टी संतोष देवरुखकर, शुभम सुनील पालकर, स्नेहल नंदकुमार वाडेकर, रिया अविनाश पालकर, तेजस अनिल पालकर, खुशी पालकर, यश द. देवरूखकर, यश समर्थ पालकर, ऋतुजा विजय सागवेकर, या सर्व विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ,भेटवस्तू व संस्थेचे शुभेच्छा प्रमाणपत्र देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.सर्व विद्यार्थांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या कामात प्रत्येकाने खारीचा वाटा उचलून काम करण्यास पुढे यावे तसेच संस्थेची वर्गणी व वास्तू निधीची देणगी वेळोवेळी देऊन संस्थेला आर्थिक दृष्ट्या बळकट करावे व संस्थेचा पाया मजबूत करावा असे आवाहन करण्यात आले. शेवटी सर्वांना अल्पोपहार, चहा देऊन राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.




# पुणे सुवर्णकार ज्ञाती संस्था आणि स्त्री शक्ती मंचच्या वतीने सामुदायिक मौजीबंधनसाठी जाहिर आवाहन!

पुणे सुवर्णकार ज्ञाती संस्था आणि स्त्री शक्ती मंच आयोजित सामुदायिक मुंजी व सामुदायिक विवाह १५ एप्रिल ते १५ मे २०२४ या कालावधीत घ्यायचे आहेत. ज्या पाल्यांची व ज्या वधू-वरांची नोंदणी करायची असेल त्यांच्याकरता मुंजीसाठी प्रत्येकी २५०० रू.व लग्नासाठी वधू आणि वर प्रत्येकी दहा हजार रुपये असे ठेवण्यात आले आहेत. तरी आपणास नोंदणी करायची असेल तर या ग्रुपवर बटूचे आणि वधू-वरांचे नाव आणि मोबाईल नंबर ह्या ग्रुपवर पाठवावे म्हणजे आपल्या सुवर्णकार ज्ञाती संस्थेच्या माध्यमातून आपल्याला संपर्क करण्यात येईल.

आपली वर्गणी आपल्याकडे येऊन घेण्यात येईल. त्याची पावती आपणास तिथेच देण्यात येईल याची सर्व समाज बांधवांनी नोंद घ्यावी. जेवढ्या लवकर आपण नोंदणी कराल तेवढं आयोजन करण्यास आपण यशस्वी होऊ. आजपर्यंत पुणे सुवर्णकार ज्ञाती संस्थेने साडेसहाशे मुंजी आणि चार वधू-वरांची लग्न सामुदायिक रित्या लावलेली आहेत. तरी लवकरात लवकर खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधून आपले नाव नोंदवावे. अशी नम्र विनंती.

अनिल द. नगरकर (सिंहगड रोड) ७७२२०५११३५
सूर्यकांत सागवेकर (गोखले नगर) ९६२३६७७८२६
कृष्णा ज. पालकर (शिवाजीनगर) ९८२२१७१३४७
मोहन शा. देवरुखकर (कोथरूड) ८७६६८५०९०८
अशोक ग. पालकर (हडपसर) ९८२२४५०६९५
संदीप देवरुखकर (कळस) ९०२१८८१०००
अनिल तू. पंडित (कर्वेनगर) ९२७००४१९२८
वासुदेव देवरुखकर (डेक्कन प्रभात रोड) ८९८३३५९६३९
संदेश देवरुखकर (पिंपरी चिंचवड) ९७६७३३१३९४
समीर सागवेकर (दत्तवाडी) ९०११४९२३४४
गणेश पाचेरकर (पुणे सिटी एरिया) ९८२३०२२१६९
सौ अश्विनी देवरुखकर ९८२२०९१५६४
मंगेश नांदेडकर (कसबा पेठ) ९९२२४८९११०
राजेंद्र पालकर (धनकवडी कात्रज) ८३०८२६६९२३

**आपले स्नेहांकित,**

सर्व कार्यकारणी पुणे सुवर्णकार ज्ञाती समाज आणि पुणे सुवर्णकार ज्ञाती स्त्री शक्ती मंच

# विश्वकर्मा (पंचाल) सुवर्णकार समाज सातारा संस्थेच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन

सातारा शहरासह जिल्ह्यातील सुवर्णकारांना एकत्रित करुन स्थापन करण्यात आलेल्या विश्वकर्मा (पंचाल) सुवर्णकार समाज सातारा संस्थेने अनेक वर्षांपासून समाजबांधवांसाठी उल्लेखनीय काम केलेले आहे. या संस्थेच्या माध्यमातून कार्यरत असलेले सर्व संचालक नव्या दिशा, धोरण घेवून समाजासाठी काम करत असून पुढील वाटचालीतही अनेक उपक्रम समाज बांधवांसाठी राबवण्यात येणार आहे. **रविवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता** संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सागर सागवेकर यांनी दिली. साताऱ्यातील बुधवार पेठेतील औंधकर मठात होणाऱ्या या स्नेहमेळाव्यात सकाळी ११ वाजता दीपप्रज्वलन व संतश्रेष्ठ नरहरी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते झाल्यानंतर स्वागत, सत्कार व परिचय कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी व मान्यवरांकडून समाजाच्या पुढील वाटचालीबाबत मार्गदर्शन होणार असून संस्थेच्या माध्यमातून समाज बांधवांसाठी नवीन उपक्रमांची आखणी तसेच अडअडचणीबाबत चर्चाही होणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ बांधवांचा सन्मान करुन त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार असून महिलांसाठी हळदी, कुंकू समारंभानंतर स्नेहभोजनाचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी लकी ड्रॉ तसेच महिला व मुलांसाठी संगीत खुर्ची तसेच करमणुकीचा कार्यक्रम होणार असून या स्नेहमेळाव्यास जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष सागर सागवेकर, कार्याध्यक्ष विलास पंडीत, उपाध्यक्ष गणेश धावडसकर, सचिव किशोर पोतदार, खजिनदार प्रीतम पोतदार, संचालक सदस्य नारायण देवरुखकर, मुकेश नगरकर, संतोष देवरुखकर, वसंत देवरुखकर, रत्नदीप करंजवकर, सोमनाथ पोतदार, ॲड. मुकेश निवंडकर, सुहास पंडीत यांनी केले आहे.

# युवामंच सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०२४ प्रकाशन सोहळा संपन्न



(वृत्त पान १ वरुन)

सदानंद नगरकर यांनी युवामंचचे मार्गदर्शन करताना युवामंचास आकाशात उंच उडणाऱ्या घारीची उपमा दिली, युवामंचाने पटापट जाहिराती गोळा करून उत्तम सादर केलेली दिनदर्शिका याबद्दल कौतुक केले, मुखपृष्ठावरील चांद्रयान आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारसरणीला अनुसरून संस्थेने अपयशाने खचून न जाता चांद्रयान ज्या प्रकारे यशस्वी झाले त्याचप्रमाणे उभारी घेउन पुन्हा जोमाने कामाला लागावे, संपूर्ण महाराष्ट्रात असलेले मुंबई संस्थेचे असेच उच्च स्थानी नाव कायम ठेवायचे आहे. मुंबई संस्थेला सध्या लाभलेल्या नवनिर्वाचित नेतृत्व श्री.संजय देवरुखकर यांच्या सोबत संस्थेच्या सर्व अंगानी वेळोवेळी सहकार्य करून संस्थेचा विकासात हातभार लावायचे आहे. युवामंचने नवीन युवांना समाजाच्या प्रवाहात घेऊन येण्याचा घेतलेला संकल्प खूप उल्लेखनीय आहे आणि यासाठी माझ्याकडून शुभेच्छा असे बोलून आपले भाषण संपवले.

संस्थेचे सेक्रेटरी श्री.मोहन नगरकर यांनी युवामंचाचे कौतुक करताना युवामंच फिनिक्स पक्षाप्रमाणे उत्तुंग भरारी घेऊन काही अल्प अवधीतच खूप सारे समाजोपयोगी कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवत आहे आणि असेच त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

युवामंचचे प्रथम अध्यक्ष आणि संस्थेचे उपाध्यक्ष श्री.उदय सागवेकर यांनी बोलताना युवामंचने अविरत चालू ठेवलेले दिनदर्शिका प्रकाशनाचे कार्य हे वाखाण्याजोगे आहे आणि असेच कार्य युवामंचचे हस्ते घडत राहो आणि सर्वानी यासाठी सहकार्य करावे असे आवाहन सुद्धा केले.

शिक्षण समिती प्रमुख समर्थ सागवेकर यांनी दिनदर्शिका ते खूप कौतुक केले व युवा मंच पुढील वाटचालीस करिता शुभेच्छा दिल्या. विश्वकर्मा पंचाल मासिकाचे उपसंपादक श्री.सुनील सागवेकर यांनी मार्गदर्शन करताना सोनेरी पाऊल दिनदर्शिका ही प्रत्येक समाजबांधवांच्या घरात भिंतीवर राहते, यामार्फत आपले विचार समाज बांधवांपर्यंत पोहोचत असतात, सावरकरांचे विचार लोकांपर्यंत दिनदर्शिकेचा माध्यमातून पोहोचवणे हि खूप मोठी गोष्ट आहे. चांद्रयानाने चंद्रावर ठेवलेलं पाऊल या देशाच्या प्रगतीप्रमाणे आपली ही प्रगती होणे महत्वाचे आहे. संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. विलास वाडेकर यांनी कौतुक करताना युवामंच स्थापनेपासून त्याची काम करण्याची पद्धत खुप उल्लेखनीय आहे, युवामंच कार्यकर्ते श्री.अतुल देवरुखकर, श्री. गणेश सागवेकर, कु.ओमकार सागवेकर व सर्व पदाधिकारी यांच्या वागण्या बोलण्याच्या खुबीमुळे तसेच लोकांच्या जवळीक साधण्याची प्रयत्नामुळे युवामंच यशस्वी होत आहे. आपल्या बरोबरच सर्व संस्थेच्या अंगांना आणि समाज बांधवांना पुढे घेऊन जाण्याच्या प्रयत्नामुळे सर्वांची प्रगती होत आहे आणि यामुळेच युवामंचचे स्थान आज अढळ झाले आहे.

युवामंचचे माजी उपाध्यक्ष आणि संस्थेचे उपखजिनदार श्री.प्रशांत पालकर यांनी युवामंचच्या दिनदर्शिकेचा सुरुवातीपासूनचा प्रवास, त्यावेळी जुन्या कार्यकर्त्यांनी केलेली मेहनत या गोष्टींना उजाळा दिला आणि तीच परंपरा आज ही चालू आहे याकरिता त्यांनी सव कार्यकर्त्यांचा अभिमान आहे असे उद्गार संबोधिले आणि युवामंचास पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

वि.सु.स.पतपेढी उपाध्यक्ष आणि युवामंच सल्लागार श्री.योगेश सागवेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना एकच ध्येय, एकच ध्यास, धरूया समाज सेवेची एकच वाट हे खूप महत्वाचे वाक्य सांगून आजवर सर्वपदाधिकाऱ्यांचे ध्येय-ध्यास हा समाजाच्या प्रगती पथाची वाट कशाप्रकारे पुढे घेऊन जाऊ शकतो हि आहे, या दिनदर्शिकेचे मुखपृष्ठ व त्यावरील संदेश हे सर्वासाठी प्रेरणादायी आहेत. युवामंचचे कौतुक सर्वाकडून होताना पाहुन खूप बरे वाटत आहे. अशीच प्रगती पुढेही होत राहो आणि वरिष्ठांनी लावलेल्या या रोपाचे वटवृक्ष होताना पाहून खूप छान वाटते आहे, माझ्या शुभेच्छा कायम युवामंचबरोबर असतील असे बोलून आपले मनोगत संपवले.

संस्थेचे सल्लागार समाज श्रेष्ठी श्री.जगन्नाथ म. देवरुखकर यांनी मार्गदर्शन करताना युवामंच हे समाजाचे चैतन्य आहे, युवामंचने आजवर राबविलेल्या कार्य क्रमांना उपस्थित राहिल्यावर खरंच भारावल्या सारखे वाटत असते. दिनदर्शिका मुखपृष्ठावरील संकल्पना हे तर प्रत्येक कार्यकर्त्याचे स्वप्न आहे कि समाजाला उच्च शिखरावर नेऊन ठेवणे. आपणास लाभलेले नवीन नेतृत्व हे संस्थेच्या अंगाना प्रेरणा देणारे आहे यांचे फार कौतुक वाटते. कौतुक करण्यासाठी शब्द अपुरे पडत आहेत. महाराष्ट्रात मुंबई संस्थेचे नाव अशाच प्रकारे मोठे कराल असा विश्वास आहे आणि यातून आम्हाला मिळालेले समाधान ह मोठे असेल.

उपरोक्त संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. संजय देवरुखकर यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की युवामंच मध्ये उदय, समर्थ, योगेश, निलेश, गणेश याना काम करताना व कौतुक होताना पहिले आहे. जे उद्दिष्ट रेखाटले आहे एकच ध्येय, एकच ध्यास, धरूया समाज सेवेची एकच वाट, याप्रमाणे १०० % समाजसेवा करून वरिष्ठांनी योजिलेले स्वप्न साकार करण्याकरीता आपण सर्वजण आमच्या सोबत असाल अशी अशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. यानंतर युवामंचचे अध्यक्ष श्री. गणेश सागवेकर यांनी दिनदर्शिका २०२४ साठी टीमच्या कामाचा उल्लेख करताना जाहिरातदार गोळा करून खजिनदार कु. ओमकार सागवेकर यांनी जाहिरातीची नोंद एक्सेल मध्ये उत्तम केली, अतुल देवरुखकर यांच्या मार्गदर्शनाखाली कु.शुभम सागवेकर यांनी उत्तम जाहिरातीचे डिझाईन बनवल्या, अतुल देवरुखकर यांनी मुखपृष्ठ संकल्पना, विलास सागवेकर यांनी केलेले दिनांकाचे फॉरमॅट वआशिष पालकर यांनी प्रिंटिंगसाठी केलेले काम, संदीप वाडेकर यांनी महाराष्ट्रातील समाजबांधवांपर्यंत दिनदर्शिका पोहोचविण्यासाठी कुरियर सेवा उपलब्ध करून देण्यास मदत केली, तसेच प्रसाद चिखलकर, मंगेश पालकर, अमित पालकर व संकेत नगरकर यांनी दिग्दर्शिका प्रकाशनाची तयारी करणे तसेच यांनी जाहिरातीसाठी केलेले प्रयत्न या सर्व टीमवर्कमुळे युवामंचाचे सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०२४ आपल्यासमोर साकारली गेली, याबद्दल संपूर्ण युवामंच टीमचे जाहीर आभार मानले.कार्यक्रमाची सांगता करताना सचिव श्री. अतुल देवरुखकर यांनी आभार पुढीलप्रमाणे व्यक्त केले, सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०२४ या उपक्रमास सर्व समाजबांधवांनी आम्हाला जाहिरात देऊन उपकृत केल्याबद्दल आपले मन:पूर्वक आभार! या उपक्रमातून मिळालेल्या आर्थिक मोबदल्याचा वाटा युवामंच पुढील सामाजिक उद्दिष्टे राबविण्यासाठी उपयोग करत असतो, युवा मंच सोनेरी पाऊल दिनदर्शिका २०२४ हा उपक्रम साकारण्यास सर्व युवामंच कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे, आपण केलेल्या सहकार्याबद्दल वि. सु. समाज मुंबई संचालित युवामंच आपले शतशः आभारी आहोत, असेच सहकार्य दरवर्षी मिळो हीच श्री विश्वकर्मा व श्री संत नरहरी महाराजांच्या चरणी प्रार्थना असे बोलून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता केली.

# संगमेश्वर येथील श्री देवी बागेश्री मंदिरात वार्षिक उत्सव पौष पौर्णिमा संपन्न




कसबा संगमेश्वर येथील श्री देवी बागेश्री मंदिरात गुरुवार दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी वार्षिक उत्सव पौष पौर्णिमा या दिवशी संपन्न झाला. दिवशी सकाळी ब्राह्मणांकडून अभिषेक, पूजा, आरती तीर्थप्रसाद आणि दुपारी महाप्रसाद व सायंकाळी महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ संपन्न झाला. या उत्सवासाठी रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष श्री. संजय बा.देवरुखकर सपत्नीक उपस्थित होते. संगमेश्वर शाखा अध्यक्ष चंद्रकांत नरहरी सागवेकर, सचिव कल्याण कोसुंबकर, ज्येष्ठ समाज बांधव श्री. धर्माजी गंगाराम पालकर सपत्नीक उपस्थित होते. संगमेश्वर तालुका आणि रत्नागिरी येथील बंधू भगिनी यांनी देवीच्या दर्शनाचा व तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. या उत्सवाचे सर्व नियोजन श्री. बोरसुतकर गुरुजी आणि श्री. दादा सैतवडेकर यांनी उत्तमरित्या पार पाडले.

## वि.सु.समाज मुंबई संस्थेच्या अध्यक्षपदी संजय स. देवरुखकर यांची नियुक्ती

(वृत्त पान १ वरुन)
होती. त्याचप्रमाणे वडिलोपार्जित वारसाच जणू संजयला लाभला आहे. आज संस्थेच्या इतिहासात प्रथमच उच्चशिक्षित असे अध्यक्ष संस्थेला लाभले आहेत. त्यांची कामाची पद्धत अतिशय वाखाणण्याजोगी आहे. पतपेढीचा कारभार अतिशय जबाबदारीने सांभाळत संस्थेचे सरचिटणीस आणि उपाध्यक्षपद ही भूषवले आहेत. आता अध्यक्ष झाल्यामुळे त्यांची जबाबदारी वाढलेली आहे. जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवून सामाजिक कार्यात स्वत:ला वाहून घ्यावे लागते. तरी आपल्याकडून समाजाचे भले व्हावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

श्री.र.गं.देवरुखकर यांनी त्यांचे अभिनंदन करून असे सांगितले की, संस्थेची आर्थिक बाजू बळकट कशी होईल यासाठी काही योजना अमलात आणाव्यात. श्री.सदानंद द.नगरकर यांनी विशेष अभिनंदन करताना असे म्हणाले की, उच्चशिक्षित अध्यक्ष मिळाल्यामुळे संस्थेला चांगली भरारी घेता येणार आहे. आजीव सभासद, आर्थिक उन्नतीसाठी लॉटरी, नाटक, करमणुकीच्या कार्यकर्माच्या आयोजनाद्वारे अर्थ संकलन करता येईल. त्यासाठी सर्व कार्यकारिणी आपल्या सोबत असणार आहे. आपल्याला पुढील भवितव्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

त्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष श्री.संजय स.देवरुखकर यांनी आपले मनोगत मांडताना सांगितले की, आपण जी जबाबदारी दिली आहे ती पेलवण्याची, जास्तीत जास्त खबरदारी घेवून संस्थेचे नाव यापुढेही असेच उज्वल राखले जाईल याची मी आपणा सर्व मान्यवरांच्या साक्षीने ग्वाही देतो. त्यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## दिवा,डोंबिवली,कल्याण, भिवंडी ते कर्जत - कसारा या विभागीय संस्थेचा वार्षिक स्नेह मेळाव्याचे आयोजन

दिवा,डोंबिवली,कल्याण, भिवंडी ते कर्जत - कसारा या विभागीय संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा दि.१८ फेब्रुवारी,२०२४ रविवार रोजी वक्रतुंड सभागृह, ३ रा मजला, श्रीगणेश मंदिर, फडके क्रॉस रोड,डोंबिवली पूर्व येथे दु. ४ ते ८ या वेळात आयोजित केला आहे. मेळाव्यात महिलांचे हळदीकुंकू, लहान मुला मुलींचे डान्स, महिलांचा डान्स इ. कार्यक्रम आयोजित केले आहेत. तरी विभागातील सर्व ज्ञाती बंधू आणि भगिनींनी या स्नेह मेळाव्याला हजर राहावे ही विनंती. तसेच खालील ज्ञाती भगिनी कडे नावे देवून महिलांच्या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा ही विनंती.

श्री.सुरेश पालकर,अध्यक्ष
श्री.पांडुरंग वारणकर,सचिव
सौ.एकता एकनाथ पालकर ७७३८५६७०५४
सौ.माधवी उदय पालकर ९८७०४०९३८६, ८३६९६९५८८१.




विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई संचालित “युवामंच” च्या मार्फत “महाराष्ट्रातील सुवर्णकार समाजाअंतर्गत भव्य अंडरआर्म बॉक्स क्रिकेट सामने” खेळवण्यात आले होते. यामध्ये वरिष्ठ कार्यकारिणीचा सामना “विश्वकर्मा वरिष्ठ A (कर्णधार - सदानंद नगरकर)” आणि “विश्वकर्मा वरिष्ठ B (कर्णधार - मोहन नगरकर)” असा खेळविण्यात आला. मौज-मजा-मस्ती करत खेळलेल्या या सामन्यात अखेर “विश्वकर्मा वरिष्ठ A” हा संघ विजयी झाला आणि सर्वांनी जल्लोषात आनंद साजरा केला. यानंतर न भूतो न भविष्यती असा संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच संस्थेच्या महिला संघटना यांनी तयार केलेले महिलांचे “विश्वकर्मा महिला A (कर्णधार-विभा सागवेकर)” आणि “विश्वकर्मा महिला B (कर्णधार-अनिता सागवेकर)” हे संघ आपल्या ताकदीनिशी मैदानात सामने खेळायला उतरले. या सामन्यात अखेर “विश्वकर्मा महिला B” हा संघ विजयी झाला आणि सर्वांनी जल्लोषात आनंद साजरा केला.

## विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादित

५ सय्यद अली चाळ, जमील नगर, भांडुप (प.), मुंबई - ४०००७८.
दूरध्वनी: ०२२ २४३७ ५३२९ email ID : vishwakarmapatpedhi@gmail.com


### जाहीर आवाहन

विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादितच्या सर्व सभादांना कळविण्यात येते की, पतसंस्थेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ मार्च २०२२ रोजी संपला असून याची सूचना या अगोदरच मासिकात जाहीर करण्यात आली होती. कोविड महामारीमुळे निवडणूक घेणे सहकार खात्यास शक्य झाले नाही. परंतु या चालू वर्षामध्ये आपल्या पतसंस्थेची संचालक मंडळाची निवडणूक कधीही जाहीर होऊ शकते. तत्पूर्वी इच्छुक उमेदवारांनी पतसंस्थेच्या कार्यालयात संपर्क साधावा.

आपले नम्र,
श्री. मनोहर ल. पालकर
(अध्यक्ष)
**विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी मर्यादित**

## स्व.भार्गव शंकर सागवेकर

**स्व.आई व स्व.दादांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!**



मुर्तिमंत वात्सल्याची,
आम्ही घेतली अनुभुती,
आजही तुझ्या स्मृती,
नयनी दाटूनी येते पाणी!

**आपले,**
**श्री. सुनिल भार्गव सागवेकर**
**सौ. प्रिती, श्रीमती अनिता,**
**कु.अंकीत, कु.मृणाली, कु.जित**

## सुमित्रा दत्तात्रय देवरूखकर



स्वर्गवास : २५ ऑक्टोबर २०२२

कष्टने केली आयुष्याची सुरुवात,
सगळ्यावर फिरवला मायेचा हात,
सुख जवळ येताच काळाने फिरवली पाठ,
जन्मोजन्मी पाहु आम्ही तुमची वाट

**प्रथम पुण्यस्मरण १४/११/२०२३ (तीथीनुसार)**
**आपले विनीत:** दत्तात्रय देवरूखकर आणि कुटुंब
पत्ता – ३१६ डी १७, हेमराजवाडी, ठाकुरद्वार मुंबई ४००००२
संपर्क – ९९६९४ ५३१९९

## सागवेकर ज्वेलर्स

१२९, सीता सदन, दुकान नं.१, बॉम्बे बझारच्या समोर, जे.पी. रोड, अंधेरी (प.), मुंबई - ५८. टेलि. : २६७७५७०५

## सागवेकर तारपाटा

गीता इस्टेट, जय प्रकाश रोड, अंधेरी (प.), मुंबई - ५८. फोन : ६७७४५७०

- - - - - - - - - - - - - - -

निवास: बि-१०३, दिपाली को.ऑ.हौ. सोसायटी, बि.नं.३८, आझाद नगर, वि. रा.देसाई रोड, क्रिडा संकुलमागे, अंधेरी (प.), मुंबई -५३. टेलि.: २६७३४५७४, २६७७०४१६, ९३२२२७२६०१

## भावपूर्ण श्रद्धांजली!




**दहिसर** येथील समाजबांधव सुभाष लक्ष्मण देवळेकर यांच्या सासूबाई **श्रीमती सरस्वती गजानन पंडित** यांचे दिनांक २९/१२/२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



**डोंबिवली** येथील समाज बांधव **श्री. शंकर बाबु सागवेकर**. (गाव-मु.पो.मिरवणे, ता-चिपळुण, जि-रत्नागिरी) वय५०, यांचे दिनांक ०८ जानेवारी २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



**मु.साडवली**,देवरूख रोड येथील ज्येष्ठ समाजभगिनी **श्रीमती सुलभा रघुनाथ सागवेकर** यांचे दिनांक ८/०१/२०२४ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्या श्री.मंगेश रघूनाथ सागवेकर (सरचिटणीस,विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार ज्ञाती समाज, रत्नागिरी जिल्हा) यांच्या मातोश्री होत्या.



सुवर्णकार ज्ञाती संस्थेचे जेष्ठ सदस्य **अनंत बाबुशेठ वारणकर** यांचं दु:खद निधन ११/१/२०२४ रोजी झाले. पुणे संस्थेचे आधारस्तंभ आपल्यातून आज निघून गेले संस्थेची जी आज हानी झाली ती कधीही भरून न येण्यासारखी आहे. शांत स्वभावाचे मित भाषेचे आणि सतत समाजाला मदतीचा हात कायम असणारे अशा दिलखुलास व्यक्तिमत्वाला समाज मुकला आहे. त्यांना संस्थेकडून तसेच सुवर्णकार ज्ञाती स्त्री शक्ती मंचाकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.



**कसबा**, तारळे येथील समाज बांधव **अनिल नामदेव पोतदार(तारळेकर)** रा. कसबा तारळे ता.राधानगरी यांचे मंगळवार दि. १६-०१-२०२४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.



श्री संत नरहरी महाराज ग्रूप पुणेचे सदस्य श्री शामकिरण वासुदेव सागवेकर यांच्या मातोश्री **श्रीमती नलिनीताई वासुदेव सागवेकर** यांचे दि.२३/०१/२०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.



**उत्तमनगर**,कर्वेनगर येथील सुवर्णकार ज्ञाती संस्था पुणेचे कार्यकर्ते **श्री. किरण गणपत बोरसुतकर** यांचे दि.२८/०१/२०२४ रोजी वयाच्या ४० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.



विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबईचे हितचिंतक, सामाजिक कार्यकर्ते मा.संदिप गोपीनाथ सागवेकर यांची बहीण **सौ.ज्योती दिपक वारणकर** यांचे दि. २८/०१/२०२४ रोजी संध्याकाळी अल्पशा आजाराने दुख:द निधन झाले.

## प्रथम पुण्यस्मरण

### कै. सुलोचना बाळकृष्ण पालकर



आई... आपल्या तत्वांशी एकनिष्ठ होतीस तु...
अथक प्रयत्नांनी माणसं घडविलीस तु...
सर्वांच्या हृदयावर राज्य केलेस तु...
आपुलकीचा व मायेचा आधारस्तंभ होतीस तु...
शेवटच्या श्वासापर्यंत माणुसकी जपलीस तु..
म्हणूनच देवाला सुद्धा आवडलीस तु...
आई.. तुझे ध्येय हेच आमचे प्रेरणास्थान!

**वर्षश्राद्ध**
सोमवार, दि. १९ फेब्रुवारी २०२४
स्थळ: मु. पो. हुंबरी वरची ता. खेड जि. रत्नागिरी

भावपूर्ण श्रद्धांजली!

आपले विनीत:
श्री.अनिल बाळकृष्ण पालकर, श्री.संजय बाळकृष्ण पालकर
सौ.कुसुम दिपक नगरकर, सौ.सुरेखा संतोष देवरुखकर

## प्रथम पुण्यस्मरण

### कै. श्रीमती लक्ष्मी कृष्णा सागवेकर



मृत्यु : माघ शके १९४४, शुद्ध द्वतीया
सोमवार, दि. २३/०१/२०२३

मायेची गेली सावली !
करुणेचा हरवला सागर !!
उरली नाही साथ आम्हाला !
आठवण येते क्षणाक्षणाला !!

भावपूर्ण श्रद्धांजली!

आपले विनीत:
श्री. संजय कृष्णा सागवेकर, श्री. प्रतिक संजय सागवेकर
सौ. सायली संजय सागवेकर, सौ. उत्कर्षा प्रतिक सागवेकर
श्री. सुनिल कृष्णा सागवेकर, प्रणित संजय सागवेकर,
सौ. सुप्रिया सुनिल सागवेकर, अनुजा सुनिल सागवेकर
श्री. महेश कृष्णा सागवेकर, मनाली सुनिल सागवेकर,
सौ. मनिषा महेश सागवेकर, गंधर्व महेश सागवेकर

## विश्वकर्मा पंचाल चे आजीवन सभासद व्हा

आजीवन सभासद मुल्य १,०००/- (एक हजार रुपये मात्र) रोख अथवा चेक, डी.डी. **“Vishwakarma Panchal”** या नांवे द्यावा, खालील खात्यावर ट्रान्स्फर करावेत. यासाठी पुर्ण नांव व पुर्ण पोस्टल पत्ता पीन कोड सह, दुरध्वनी तसेच मोबाईल क्रमांक, सोबत एक फोटो पाठवावा.

**Bank Name: Saraswat Co-op. Bank Ltd., (saving Account)**
**Branch- MadhuKendra, Dadar (w.),Mumbai,**
**A/c. No: 006200102908646, IFSC Code: SRCB0000006**

स्कॅन करा आणि पैसे पाठवा.


## विश्वकर्मा पंचाल

मालक
**विश्वकर्मा सुवर्णकार समाज** (रजि.) मुंबई
३५६ डब्ल्यु ८, चोकशी बिल्डींग, रानडे रोड, दादर (प), मुंबई-२८, ☎२४३७ ५३२९

**-: नोंदणीकृत कार्यालय :-**
अे-२,/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, काळाचौकी, मुंबई-३३

**प्रकाशक - मुद्रक - संपादक**
**श्री. सुनिल दत्ताराम देवरुखकर**

**-: पत्रव्यवहार :-**
एस-२,श्री कृपा, डॉ.आंबेडकर रोड, समर्थ हनुमान पथ, काळाचौकी, (चिंचपोकळी, पू.) मुंबई -३३.
संपर्क : ८६८९८ ७२३५२ व्हॉट्स ॲप
E-mail: vpmonthly@gmail.com
prasadart29@gmail.com

**-: उपसंपादक :-**
श्री. सुनिल स. सागवेकर - ७७३८०४९२०३
श्री. मोहन ह. नगरकर - ९८६९६६९०२०
श्री. अतुल रा. देवरुखकर - ९८३३६५५०८९

**-: सहा.संपादक :-**
श्री. मनोहर म. सागवेकर (पुणे) - ९९६०४३६७०९
श्री. संदिप वि. वाडेकर - ९८१९६३०२८५
श्री. गणेश द. सागवेकर - ९२२१६७२२९९
कु. शुभम रा. सागवेकर - ८२९१८६९०२२
कु. ओमकार सु. सागवेकर - ९१६७३३९८२०
श्री. आशिष अ. पालकर - ७७१८९४९८३०

**सल्लागार:**
**श्री. श्रीधर रा. सागवेकर**
(अध्यक्ष - विश्वकर्मा सुवर्णकार समाज मुंबई)
**श्री. सदानंद द. नगरकर**
(अध्यक्ष - वि.पं.सु.समाज महासंघ )

**कायदेविषयक सल्लागार**
**ॲड. सौरभ नरेंद्रकुमार देवरुखकर**- B.L.S., L.L.M

**विश्वकर्मा पंचाल वधुवर सुचक प्रमुख**
**श्री. पद्माकर बापुशेठ नगरकर**
**संपर्क : ०२२२३७१७५४९, ९९६९६३४६८३**



हे मासिक **मालक विश्वकर्मा सुवर्णकार समाज(रजि.) मुंबई**, चोकशी बिल्डींग, रानडे रोड, दादर (प), मुंबई - ४०००२८, ☎०२२ २४३७५३२९ यांचेसाठी **प्रकाशक-मुद्रक श्री. सुनिल देवरुखकर** यांनी **प्रसाद आर्ट**, एस-२, श्री कृपा, डॉ. आंबेडकर रोड, (चिंचपोकळी, पुर्व) काळाचौकी, मुंबई -४०००३३. येथे छापून अे-२/५४, ओमकार, डॉ.आंबेडकर रोड, श्री समर्थ हनुमान पथ, (चिंचपोकळी, पुर्व), काळाचौकी, मुंबई -४०००३३ येथून प्रकाशित केले.
**संपादक: सुनिल दत्ताराम देवरुखकर, भ्रमणध्वनी - ८६८९८७२३५२ । टीप : वृत्तपत्रातील बातम्या अथवा मजकूराशी संपादक अथवा संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**
**कृपया आपल्या बातम्या व फोटो vpmonthly@gmail.com या ईमेलवर अथवा “विश्वकर्मा पंचाल” या व्हॉट्सअप ग्रुपवर पाठवाव्यात.**